# घटक ४ : (अ) कर्मवीर भाऊराव पाटील

## अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टिपा

४.३ उताऱ्याचा अभ्यास भाग १

- ४.३.१ उताऱ्याचे मनन व मुद्दे.
- ४.३.२ जोतिराव फुले परंपरेचे वारसदार.
- ४.३.३ शिक्षण - समाज परिवर्तनाचे साधन.
- ४.३.४ स्वावलंबी शिक्षण.
- ४.३.५ दोन चित्रे.
- ४.३.६ उताऱ्याच्या दुसऱ्या भागाचे मनन व मुद्दे.
- ४.३.७ वसतिगृहाचे शिक्षण क्षेत्रात महत्त्व.
- ४.३.८ कर्मवीर भाऊरावांचे तत्त्वज्ञान.
- ४.३.९ शिक्षण क्षेत्रात ऋषिसत्ता हवी.

४.४ नमुना उत्तरे

४.५ अधिक अध्ययन

- ४.५.१ चरित्रातील ठळक घटना
- ४.५.२ रयत शिक्षण संस्थेचा आजचा विस्तार

४.६ सारांश

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

'शिक्षण घेणे हा प्रत्येक माणसाचा जन्म सिध्द हक्क आहे' या विचारसूत्राचा आग्रह एकोणिसाव्या शतकात महात्मा जोतिराव फुले यांनी मांडला. शिक्षण हे विकासाचे साधन आहे. म्हणून शिक्षण घेण्याची संधी प्रत्येकाला मिळाली पाहिजे. महात्मा फुले यांच्यापासून समाजाशिक्षणासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्यांची परंपरा सुरू झाली. या घटकाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हांला

* कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा परिचय होईल.
* कर्मवीर भाऊराव पाटलांचे विचार तुम्ही स्पष्ट करू शकाल.
* 'समतेसाठी शिक्षण' या नव्या शैक्षणिक धोरणातील सिध्दांताच्या संदर्भात कर्मवीरांच्या कार्याचे मूल्यमापन करता येईल.
* या उताऱ्यांची भाषिक वैशिष्टये तुमच्या लक्षात येतील.

## ४.१ प्रास्ताविक

महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक घडणीत अनेक विचारवंतांनी हातभार लावला आहे. त्यांचा वैचारिक वारसा आणि त्यांचे कर्तृत्व भावी पिढयांना प्रेरक ठरले आहे. महात्मा फुले, न्या.रानडे, लो.टिळक, आगरकर, गोखले, शाहू छत्रपती, महर्षी शिंदे, डॉ.आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील अशी कितीतरी नावे समोर येतात. त्यांनी आपले सर्व आयुष्य लोकहितार्थ वेचले.

कोणतेही परिवर्तन सहजासहजी घडून येत नाही. ते हळूहळू घडून येते. राजसत्ता, कायदा, शिक्षण ही परिवर्तनाच्या प्रक्रियेची अविभाज्य अंगे आहेत तशी ती साधनेही आहेत. म.फुल्यांपासून डॉ.आंबेडकरापर्यंत प्रत्येकाने परिवर्तनाचे प्रभावी हत्यार म्हणून शिक्षणाचाच पुरस्कार केला. शिक्षणामुळे जाणीव जागृती होते आणि त्यातूनच स्वतंत्र विचारशक्ती निर्माण होते. विचार हा कृतीचा प्रेरक असतो.

कर्मवीर भाऊराव पायगोंडा पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना ४ आक्टोबर १९१९ रोजी केली. प्रथम वसतिगृह सुरू केले. या वसतीगृहात भिन्न भिन्न जातींचे विद्यार्थी एकत्र राहात, एकत्र जेवत व एकत्र अभ्यास करीत. कर्मवीरांनी शाळा, महाविद्यालये यांचे जणू जाळेच निर्माण केले आणि शिक्षण समाजाच्या सर्व थरात पोचवले. त्यांच्या कार्याचा परिचय प्रस्तुत उताऱ्यात आहे.

## ४.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टिपा

आत्ममग्न - स्वतःतच गढून गेलेले.
मूळ धरणे - रूजणे.
गाडून टाकणे - नष्ट करणे.
बीजारोपण करणे - आरंभ करणे, सुरू करणे.
आचरणात आणणे - कृतीत उतरवणे.
अवलोकन - पाहणी
हात पसरणे - याचना करणे.
हरळी - गवत
खतपाणी घालणे - चांगले पोसणे.
हयात - आयुष्य

जोतिराव फुले महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक. त्यांनी मुलींच्यासाठी आणि अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. त्या शाळांत अध्यापन केले. सत्यशोधक समाजाची स्थपना केली.
मकेरेन्को - रशियातील शिक्षणतज्ज्ञ
राजर्षी शाहू छत्रपती - कोल्हापूरचे संस्थानिक. प्रगतिशील विचार कृतीत उतरवणारे श्रेष्ठ राजर्षी
अमृतलाल ठक्कर - म.गांधींचे अनुयायी व कार्यकर्ते
ज्ञानप्रकाश - मराठीतील सर्वात जुने दैनिक. या प्रागतिक धोरणे असलेल्या दैनिकाने शंभरी पूर्ण केली होती.

## ४.३ उताऱ्याचा अभ्यास भाग १

कर्मवीर भाऊराव पाटील.

### ४.३.१ उताऱ्याचे वाचन, मनन व मुद्दे.

कर्मवीर भाऊराव पाटील ही एक शिक्षणक्षेत्रातील महान व्यक्ती तर होतीच पण ती एक प्रभावी शक्ती होती. जोतीराव फुल्यांची जीवनदृष्टी ही भाऊरावांच्या शिक्षणकार्याची प्रेरणा होती. जगात ज्यांनी ज्यांनी क्रांतीचे सिद्धांत सांगीतले त्यांनी त्यांनी समाजशिक्षणावर भर दिला. कारण शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे श्रेष्ठ अस्त्र आहे आणि शिक्षण हेच समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेचे अविभाज्य अंग आहे.

दुर्दैवाने या देशात ज्यांच्याजवळ विद्या आहे ते आत्ममग्न आहेत. त्यांना चिंताआहे ती केवळ आपल्या वेतनवाढीची, सुरक्षिततेची आणि कमीत कमी काम करून अधिकात अधिक अर्थलाभ कसा पदरात पडेल याची. संकुचितपणाचे घरटे सोडून बाहेरच्या अभावग्रस्त समाजाची त्यांना जाणीव नाही. हा अभावग्रस्त समाज मुक्तपणे भोगतो आहे अज्ञान, रोगराई, दारिद्र्य आणि जुलूम. अशा अभावग्रस्त समाजाची वेदना भाऊराव पाटीलांना जाणवली पण भाऊराव पाटलांच्या कार्याची प्रेरणा आजच्या पिढीत धड मूळ धरत नाही ही चिंतेची बाब आहे.कारण आजचे विद्यावंत विद्येला केवळ उपजीविकेचे साधन मानतात. भाऊराव पाटील विद्येला मुक्तीचे अस्त्र मानतात, विद्या माणसाचे मन प्रसन्न करते, विद्या माणसाची दृष्टी विशाल करते. विद्येचे वळण जगण्याला उपयोगी ठरते.

एक काळ असा होता की विद्येचा, ज्ञानाचा प्रवाह वरच्या थरातून हळूहळू झिरपत खाली येईल आणि अशा रीतीने सर्व समाज विद्यावंत होईल अशी समजूत होती. ही वरून झिरपण्याची प्रक्रिया मुळी शक्य नाही. ज्ञान झिरपू न देण्याचा, ज्ञानाच्या वाटा बंद करण्याचा प्रयत्न करणारा हितसंबधी वर्ग प्रत्येक कालखंडात असतो. ज्ञानाचे लोण समाजाच्या सर्व थरात विशेषतः तळागाळात पसरू नये अशी धडपड विद्यावंत करीत असतात. तळातील माणसं गाळात गाडून टाकण्याच्या विविध योजना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर फार गतीने वाटचाल करीत आहेत असे वाटते पण जाणत्यांनी आता तळागाळातील माणसांची जीवनदृष्टी बदलली पाहिजे. त्यांच्या मनात जीवनशिक्षणाविषयी प्रेम निर्माण केले पाहिजे. शिक्षण हाच जीवनाधार आहे. एक आदिवासी स्त्री मेळाव्यात म्हणाली, 'उन्हातून जाताना पायांना चटके बसतात. तेव्हा पायताणाचा आधार मिळतो तसं जीवनात गरिबीचे चटके बसतात आणि मन पोळून निघतं तेव्हा शिक्षण हा आधार असतो.' या आदिवासी स्त्रीला ही दृष्टी कुणामुळं मिळाली ? मला वाटंत, शिक्षणानं या स्त्रीला तिसरी दृष्टी मिळाली. माणूस म्हणून मानानं जगण्याची इच्छा शिक्षणांमुळंच उत्पन्न होते. कर्मवीर पाटलांना हे बरोबर जाणवले आणि त्यांनी शिक्षणसंस्थांचे बीजारोपण केले. तळागाळातल्या, बहुजनसमाजातल्या माणसावर शिक्षणाचे संस्कार केले तरच समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला वेग येईल हे कर्मवीरांनी जाणले व ते आचरणात आणले.

### ४.३.२ जोतीराव फुले परंपरेचे वारसदार.

भाऊराव पाटील यांचा जन्म फुले हयात असताना झाला. तरी भाऊरावांनी फुल्यांना पाहिले नव्हते. जोतिराव फुल्यांच्या विचारांचा त्यांच्या मनावर प्रभाव पडला. शिक्षणप्रसार हा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीचा एक मुख्य उद्देश. भाऊरावांनी फुल्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेतली आणि रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. ही कल्पना 'काले' येथील सत्यशोधक परिषदेतूनच साकारली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणत, "सत्यशोधक चळवळीने सातारा जिल्ह्यातील जमीन नांगरली. ही नांगरट करून तिच्यामध्ये भाऊरावांनी पीकही पेरले. केवळ नांगरट केली नाही." फुले - शिंदे - आंबेडकर - शाहू - गाडगेमहाराज यांचा वारसा भाऊरावांनी चालवला.

भाऊराव म्हणाले होते की– विद्येत वरिष्ठ असणाऱ्या वर्गापेक्षा, विद्येत मागासलेल्या समाजातून, खेडयापाडयांतून विद्येत पुढे असणाऱ्यांमध्ये जे पंडित असतात, त्यांच्याही पेक्षा भारी विद्वान, ज्यावेळी तयार होतील त्यावेळी माझं कार्य संपेल व जोतिबांची इच्छा पूर्ण होईल"

### ४.३.३ शिक्षण: समाजपरिवर्तनाचे साधन.

नव्या शैक्षणिक धोरणात शिक्षणाचे एक उद्दिष्ट समाजपरिवर्तन असे मान्य केले आहे. राजसत्ता, कायदा ही समाजपरिवर्तनाची आणखी काही साधने. पण शिक्षण हे प्रभावी साधन. अगदी तळागाळापर्यंत शिक्षण नेले पाहिजे हे सूत्र मनात बाळगून भाऊरावांनी खेडयापाडयात शाळा सुरू केल्या, महाविद्यालये स्थापली. सर्वजातीचे विद्यार्थी एकत्र राहून शिक्षण घेऊ शकतील अशी वसतीगृहे सुरू केली. जनतेच्या पाठिंब्यावर जनतेचे प्रबोधन करण्यासाठी रयतशिक्षणसंस्थेचा वटवृक्ष फोफावला त्याचे कारण भाऊरावांचे सततचे परिश्रम, त्यागभावना, संघटनकौशल्य, जबर ध्येयनिष्ठा आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. भाऊरावांच्या शैक्षणिक कार्यामुळे ग्रामीण भागात नवजागरण तर झालेच पण नवे नेतृत्वही निर्माण झाले.

### ४.३.४ स्वावलंबी शिक्षण.

भाऊरावांनी 'स्वावलंबी शिक्षणा' ची संकल्पना कृतीत आणली आणि श्रमाला प्रतिष्ठा दिली. मध्यस्थ - दलाल नको असे एक विचारसूत्र म.फुल्यांनी मांडले. स्वावलंबनात देखील मध्यस्थ -त्रयस्थ नसतो. 'जो दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला' असे संत रामदासांचे म्हणणे आहे. स्वावलंबन हे तत्त्व भाऊरावंनी शिक्षणात आणले. स्वावलंबन नसेल तर आत्मपरीक्षण व आत्मोध्दार अशक्य आहे.'कमवा आणि शिका'हा मंत्र भाऊरावांनी दिला आणि विद्यार्थ्यांना नवी वाट दाखवली

सोविएत पंतप्रधान ख्रुचोव्ह यांनी आपल्या दौऱ्यात १९ नोव्हेंबर १९५५ रोजी पुणे शहराला भेट दिली होती त्या वेळी त्यांची कर्मवीर पाटलांबरोबर चर्चा झाली होती. त्या वेळी सोविएत पंतप्रधान म्हणाले होते, 'तुमच्या कार्याचे अवलोकन केल्यावर आमचे थोर शिक्षणतज्ज्ञ मकेरेन्को यांची आठवण होते. मकेरेन्कोला प्रचलित शिक्षणपद्धती अपुरी व कृत्रिम वाटत होती. त्याचा भर कृतिशीलतेवर होता' भाऊरावांचा असाच आग्रह होता. विद्यापीठ म्हणजे परीक्षा घेणाऱ्या कंपन्या आहेत काय असा लो. टिळकांनी प्रश्न विचारला होता. विद्यापीठांनी ज्ञानाचे लोण तळागाळापर्यंत पोचविण्याची बांधिलकी स्वीकारली पाहिजे. पण आमचे विद्यावंत हे शिक्षणप्रसाराचे कार्य आपले कार्य असे मानीत नाहीत. उलट विद्यावंत निष्क्रिय,उदासीन बनले आहेत. समाजामध्ये सुशिक्षितांत उदासीनतेची भावना वृद्धिंगत होणे भयावह बाब आहे

भाऊराव पाटलांच्या विचाराचे मुख्य सूत्र मनुष्यत्वाची प्रतिष्ठा हे सर्व श्रेष्ठ मूल्य आहे हे जसे होते तसे श्रमाला प्रतिष्ठा दिल्याशिवाय शिक्षण अर्थपूर्ण होणारा नाही हेही होते. विद्यार्थ्याने ज्ञानार्जन करता करता अर्थार्जन करावे अशी शिकवण ते देत. मला वाटते कर्मवीरांनी खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना हाताची ओळख करून दिली. हात हे काम करण्यासाठी आहेत. हात हे निर्मितीसाठी आहेत. दुःखितांचे अश्रू पुसण्यासाठी आहेत. जे दुर्बळ आहेत त्यांच्या पाठीवर हात फिरवून धीर देण्यासाठी आपले हात आहेत याची आजच्या विद्यार्थ्यांना आपण जाणीव करून देतो काय ? स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ज्याला त्याला वाटते की याचना करावी.असे परावलंबित्वाचे जिणे जगावे असे कर्मवीरांना कधीच वाटले नाही. उलट जमिनीची मशागत करावी, तीमधून धान्योत्पादन वाढवावे व शिक्षणाचा खर्च आपल्या श्रमातून भागवावा अशी त्यांची शिकवण आहे. आज ज्यांना शिकावे असे वाटते ते नित्य अनुदान तरी मागत असतात किंवा कसल्यानाकसल्या मागण्या पूर्ण कराव्या म्हणून आंदोलने तरी करीत असतात. आपण समाजाने केलेल्या दानधर्मावर शिक्षण चालवीत नाही ही भावनाच विद्यार्थ्याला कृतिशील बनवते.

बहुजनसमाजाला तर आपल्या पायावर उभे राहण्यावाचून दुसरा पर्याय नाही. भाऊरावांची प्रेरणा ही स्वावलंबी शिक्षणाची प्रेरणा आहे.

या उताऱ्यातील पहिल्या भागाचे अधिक मनन केल्यावर खालील मुद्दे लक्षात येतील.

(१) जोतिराव फुले यांची जीवनदृष्टी ही कर्मवीर भाऊरावांची प्रेरणा होती.
(२) शिक्षणामुळे समाज परिवर्तन शक्य आहे.
(३) विद्या माणसाला मुक्त करते.
(४) तागाळातल्या माणसाला शिक्षण पाहिजे म्हणजे त्याला त्याला विकासाची संधी लाभेल.
(५) विद्यापीठांनी समाजाभिमुख झाले पाहिजे.
(६) भाऊरावांनी स्वावलंबी शिक्षणाचा आग्रह धरला व तो कृतीत आणला.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

(क) भाऊराव पाटील यांची मुख्य विचारसूत्रे कोणती ?

१ ______________________________

२ ______________________________

३ ______________________________

४ ______________________________

(ख) भाऊरावांनी स्वावलंबी शिक्षणाची योजना का कार्यवाहीत आणली ?

______________________________

______________________________

______________________________

(ग) तळागाळातील माणसांची जीवनदृष्टी का बदलली पाहिजे ?

______________________________

______________________________

______________________________

कर्मवीर
भाऊराव पाटील.

(घ) रिकाम्या जागा भरा.

१ विद्या माणसाचे मन ......... करते

२ बहुजन समाजातील माणसांवर ..........   ......... केले तर समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला वेग येईल.

३ हात हे ........ आहेत.

(ङ) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्ये पुनः लिहा

१ हे शिक्षण प्रसाराचे कार्य आपले आहे. विद्यावंत मुळीच मानीत नाही. ( एक वाक्य बनवा )

---

२ हात हे निर्मितीसाठी आहेत ( नकारार्थी करा )

---

३ विद्या केवळ उपजीविकेचे साधन नाही. ( प्रश्नार्थक करा )

---

४ ज्ञान मिळवता मिळवता अर्थार्जन करावे (अधोरेखित शब्दांसाठी 'सामासिक शब्द' योजा )

---

### ४.३.५ दोन चित्रे.

४.३.५ आता दोन चित्रे दिली आहेत. एका चित्रात वसतिगृहात सर्व जातीची मुले सामुदायिक स्वयंपाकाचा प्रयोग करीत आहेत.

आपले जेवण आपण बनवावे हाही स्वावलंबनाचा प्रयोग. ही मुले कॉन्ट्रॅक्टरवर भोजनासाठी अवलंबनू नाहीत. त्यामुळे त्यांना स्वस्त, स्वच्छ व रूचकर जेवण मिळे. दुसऱ्या चित्रात भाऊरावांच्या जीवनातला प्रसंग आहे ते म्हणतात माझे स्वावलंबी विद्यार्थी हेच माझे डॉलर्स !

(१) सामुदायिक स्वयंपाकाचा प्रयोग



अनेक जाती पातीची मुले एका वसतिगृहात एकत्रित रहात असत. स्वतःचा स्वयंपाक स्वतः करीत असत. मांडीला मांडी लावून जेवण करीत असत.

कुणी भाकरी करीत असत, कुणी भाजी चिरीत असत, कुणी ताक करीत असत, सहजीवन, सहजभोजन व स्वावलंबनाच्या सुंदर प्रयोगांची ही शाळा होती.

(२) आमच्या या डॉलर्सचे अवमूल्यन होणार नाही.



१९५२ मध्ये अमेरिकेतील प्रौढ शिक्षण तज्ज्ञ डॉ.कोप यांनी रयत शिक्षण संस्थेस भेट दिली. छत्रपती शिवाजी कौलेजचे बांधकाम चालू होते. डॉ.कोप यांना घेऊन अण्णा कॉलेज बांधकामावरती आले होते. कॉलेजचे बांधकाम चालू होते. विद्यार्थी खडी फोडण्याचे काम करीत होते. संस्थेची आर्थिक ओढाताण होती. अण्णांचे हे काम पाहून डॉ. कोप प्रभावित झाले. डॉ.कोप अण्णांना म्हणाले, 'आपल्या संस्थेकरिता अमेरिकेतून किती डॉलर्स मदत पाठवू ?'

No thank you, Dr. Kop. these are the heaps of my dollars. they won't be devalued.

आपल्या सदभावनेबद्दल मनःपूर्वक आभारी आहे.

मला तुमचे डॉलर्स नकोत, असे म्हणून विद्यार्थ्यांनी फोडलेल्या खडीच्या ढिगाकडे हात दाखऊन अण्णा म्हणाले, आमच्या या डॉलर्सचे तुमच्या डॉलर्स प्रमाणे अवमूल्यन होणार नाही.

## ४.३.६ उताऱ्याच्या दुसऱ्या भागाचे वाचन, मनन व मुद्दे.

नुकतीच एका विचारवंताची गाठ पडली. भाऊराव पाटलांच्या कार्याविषयीचर्चा करता करता मी म्हटलं, 'भाऊराव पाटलांनी शाहू छत्रपतींचं कार्य पुढं नेल.' ते विलक्षण रागावले. त्यांच्या दृष्टीनं हे विधान अनैतिहासिक होतं. पण वस्तुस्थिती लक्षात घेतली तर श्री शाहू छत्रपतींच्या श्रेष्ठ कार्याचं भाऊरावांनी महत्त्व ओळखलं होतं हे कबूल करावं लागेल. श्री शाहू छत्रपतींनी विविध जातिजमातींच्या विद्यार्थ्यांसाठी 'बोर्डिंग्ज' स्थापना केली. त्यामुळं कितीतरी हुशार विद्यार्थ्यांना ज्ञानाचा प्रकाश दिसला.ज्ञान संपादन करणं ही विशिष्ट वर्गाची मिरास आहे काय ? लिहिणं व बोलणं हे दोन व्यवसाय पांढरपेशा ब्राह्मणवर्गापुरतेच मर्यादित होते. जसजसा शिक्षणाचा प्रसार होऊ लागला तसतशी ही मिरासदारी संपुष्टात आली. कर्मवीरांनी जे वसतिगृह चालवण्याचे, शिक्षण संस्थाचे जाळे पसरवण्याचे महान कार्य सुरू केले त्याला प्रामुख्याने श्रेय आहे. 'समाजपरिवर्तनासाठी शिक्षण' हे सूत्र स्वीकारून फुले व शाहू छत्रपतींनी शैक्षणिक कार्याची बीजे पेरली. त्याचा प्रचंड वटवृक्ष उभा राहिला.त्यात कर्मवीरांचा वाटा सिंहाचा आहे. १९३५ मध्ये अ.भा.हरिजन सेवक संघाचे प्रधान मंत्री श्री.अमृतलाल ठक्कर यांनी 'ज्ञानप्रकाश'ला मुलाखत दिली होती ( १३-८-१९३५ ). त्यात ते म्हणाले, 'श्री.भाऊराव पाटील यांनी चालवलेले सातारा येथील बोर्डिंग अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. या बोर्डिंगगात १५० विद्यार्थी असून त्यात काही जैन, हरिजन व मुसलमान विद्यार्थीही आहेत. तेथील विद्यार्थ्यांची राहणी साधी असून, बोर्डिंगातील सर्व काम व स्वयंपाक ते स्वतःच करतात. या शिवाय फुरसतीच्या वेळी करण्यासाठी विद्यार्थ्यांना काही काम देण्यात आलेले असते. स्वयंपाकी अगर नोकर ही काय गोष्ट असते ते या बोर्डिंगातील विद्यार्थ्यांना माहीततही नाही.त्यांचे जेवणही साधे असते. त्यात दूध-तूप नसते.जेवणाचा मासिक खर्च अवघा ३ रु. गरीब मुलांकरिता हे नमुनेदार बोर्डिंग आहे. येथे हिन्दू, हरिजन व मुसलमान विद्यार्थी सुध्दा एकत्र मिसळतात, एवढेच नव्हे तर एका कुटुंबातील मंडळीप्रमाणे राहतात.' आपल्या वसतिगृहात कौटुंबिक वातावरण तयार करण्यात भाऊरावांना यश आले ही साधीसुधी गोष्ट नव्हे. पण कर्मवीर भाऊरावांचे कार्य जाणून घेण्याची ज्यांच्या मनाची तयारी नाही,अशांना काय सांगावे ?

वस्तुतः बोर्डिंग किंवा वसतिगृह म्हणजे नवविचाराची केंद्रे होत. कुणीसं म्हटलं आहे की 'जगप्रसिद्ध लढाया शाळेच्या क्रीडांगणावर खेळल्या जातात.' सेनापतीच्या अंगी जे गुण आवश्यक असतात त्यांची जोपासना क्रीडांगणावर होत असते असे म्हटले ते काही खोटे नव्हे. तसेच 'नेतत्वा'ला आवश्यक असलेले प्रशिक्षण वसतिगहात विविध जातिजमातींची मुले एकत्र शिकू लागली की 'जातिप्रथा वा जातीय अहंकार कमी होऊ शकेल ही भाऊरावांची कल्पना होती.

स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षे झाली तरी जातीयतेचे विष कमी झालेले नाही. उलट त्याला खतपाणी घालण्याचा नेते मंडळी प्रयत्न करताना दिसतात. समाजाचे तोंड कोणत्याही दिशेने फिरवा जातीचा राक्षस जबडा पसरून उभा आहेच. जातीच्या हरळीचे निर्मूलन करायचे म्हणजे विचाराचा ट्रॅक्टरच हवा. फुले–आंबेडकरांनी जातीच्या दुष्ट चक्राविरुद्धल युद्ध पुकारले. समतेचा लढा या देशात गतिमान करणाऱ्या क्रियाशील विचारवंतात फुल्यांचा बरोबर कर्मवीर भाऊराव पाटलांचाच समावेश करावा लागेल. समतेच्या लढायांसाठी लोकशिक्षण आवश्यक आहे. या लोकशिक्षणासाठी भाऊरावांनी आपली हयात वेचली आणि शिक्षणाची गंगा व्रतस्थपणे समाजाच्या सर्व थरांत नेऊन पोचवली.

डॉ.आंबेडकरांनी शिका, लढा व संघटित व्हा असा संदेश दिला. एका अर्थाने हा समाजपरिवर्तनाचा मंत्र होता. आज या देशात हा मंत्र उलटया क्रमाने आचरला जातो. शिक्षकापासून शिपायापर्यंत समान हितसंबंध असणारी माणसं झपाटयाने संघटित होतात पण हितसंबंधविरूद्ध असणाऱ्या प्रवृत्तीविरूद्ध लढण्याऐवजी आपापसांत लढून दुःख भोगतात. म्हणून सर्व परिवर्तनवादी चळवळींचा आरंभ शिक्षणातून होतो. 'गुलामगिरीविरूद्ध, अन्यायाविरुद्ध चिडून उठेल.' याचा अर्थ शिक्षणाचे उद्दिष्ट जाणीव-जागृती हे असते. कर्मवीरांनी हे उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी स्वावलंबी शिक्षणाचा आग्रह धरला.

मला वाटते कर्मवीर भाऊराव पाटलांनी एक महत्त्वाचा सिद्धांत आचरणात आणून दाखवला आणि तो म्हणजे प्रत्येक माणूस स्वतःला बदलू शकतो आणि माणूस स्वतःभोवतालचे वास्तव बदलू शकतो. प्रबोधनाच्या मार्गाने बहुजन समाजात नवी जाणीव पेरण्याचे काम भाऊरावांनी केले. त्यांचे विचार कृतीत उतरवणारे एक प्राचार्य मला माहीत आहेत. मंचर कॉलेजचे प्राचार्य पानवळ यांनी आपल्या कष्टातून कॉलेजच्या भोवतालचे माळरान हिरवेगार करून टाकले. हा परिसर

बदलण्याची किमया ते करू शकले, कारण भाऊरावांच्या विचारांचा दीप त्यांच्या अंतःकरणात तेवत होता. भाऊरावांच्या विचारांचा दीप आज किती जणांजवळ आहे?

कर्मवीर भाऊराव पाटील.

या देशात महर्षींची वाण नाही, वाण आहे ती विचार कृतीत आचरणाऱ्यांची. शिक्षणक्षेत्र जर 'ऋषिसत्ताक' असते तर बरे झाले असते;पण दुर्दैवाने शिक्षणक्षेत्रात आपापली स्वतंत्र सत्ताकेंद्रे उभी करून वाचाळपणा करणाऱ्यांची गर्दी फार झाली आहे. शिक्षणक्षेत्रात आज एका अर्थाने अराजकच आहे. हे नष्ट करण्यासाठी पुनः कर्मवीर भाऊराव पाटलांचा मागोवा घेतला पाहिजे यात शंकाच नाही.

वरील उताऱ्याच्या दुसऱ्या भागाचे आकलन झाल्यावर कोणते मुद्दे लक्षात येतात?

(१) भाऊरावांनी सर्व जातींची मुले वसतिगृहात दाखल केली. आपल्या वसतिगृहात कौटुंबिक वातावरण तयार करण्यात त्यांना यश मिळाले.
(२) क्रीडांगणाप्रमाणे वसतिगृहाचे महत्त्व आहे.
(३) माणूस स्वतःला व आपल्या भोवतालच्या परिस्थितीला बदलू शकतो.
(४) शिक्षणक्षेत्रात 'ऋषिसत्ता' हवी.

### ४.३.७ वसतिगृहाचे शिक्षणक्षेत्रात महत्त्व.

बहुजनसमाजाच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी रयतशिक्षण संस्थेची स्थापना झाली. पण केवळ शाळा व महाविद्यालये स्थापना करून शिक्षणाचा प्रसार होणार नाही. खेडयापाडयांतून शिक्षणासाठी येणाऱ्या मुलां मुलींच्या साठी वसतिगृहाची सोय पाहिजे. राजर्षी शाहू छत्रपतींनी विविध जातींसाठी बोर्डिंगे किंवा वसतिगृहे सुरू केली. भाऊरावांनी विविध जातींची मुले एकाच बोर्डिंगात राहून स्वावलंबी शिक्षण घेतील असा महान क्रन्तिकारक प्रयोग केला. शाहूछत्रपतींच्या नावे सुरू केलेल्या पहिल्या वसतिगृहानंतर पुणे येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी युनियन बोर्डिंग हाऊस सुरु केले आणि आता तर वसतिगृहांचे जाळेच निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या मनातील जातिप्रथांचा अभिमान कमी होत गेला. विविध विषयांचे ज्ञान मिळवता आले. 'कमवा आणि शिका' हे सूत्र असल्यामुळे श्रमाला प्रतिष्ठा मिळाली आणि स्वावलंबी शिक्षणाचा आनंद प्राप्त झाला. क्रीडांगणाप्रमाणे वसतिगृहाचे महत्त्व आहे. कारण येथे नेतृत्व जन्माला येते.

### ४.३.८ कर्मवीर भाऊरावांचे तत्त्वज्ञान.

कर्मवीर भाऊरावांचे तत्त्वज्ञान हे समाजपरिवर्तनाचे,माणसाच्या विकासाचे तत्त्वज्ञान आहे. म्हणून परिवर्तनवादी विचारात माणसाला आत्मस्थितीचे भान आणून देणे आवश्यक आहे. आत्मस्थितीचे भान येताच माणूस अंतर्मुख होतो. त्याच्या आचार विचारात बदल होतो आणि तो आपल्या भोवतालची परिस्थिती बदलून टाकण्यासाठी पावले टाकतो. कर्मवीर पाटील शिक्षणाला शंकराचा तृतीय नेत्र मानीत. तो नेत्र उघडताच अनिष्टांचा, अरिष्टांचा परिहार होतो.

### ४.३.९ शिक्षणक्षेत्रात ऋषिसत्ता हवी.

शिक्षण म्हणजे केवळ माहिती देणे नव्हे. शिक्षणाने माणसाने माणसांशी माणसासारखे कसे वागावे यांचे संस्कार होतात. असा संस्कार झालेला माणूस स्वतंत्र विचार करील आणि जे इष्ट वाटले ते निर्भयपणे आचरणात आणील. निर्भयपणे निर्धारपूर्वक बुध्दीला जे पटेल ते मांडणे हे 'ऋषीं'चे लक्षण आहे. फुले - टिळक - आगरकर - आंबेडकरांपासून शिक्षणक्षेत्रात ऋषीसत्ताच हवी. शिक्षणक्षेत्रात राजकरणी, स्वार्थी माणसे शिरली की शिक्षणक्षेत्रात भ्रष्टाचार सुरू होतो. शिक्षणाचे बाजाराकीकरण सुरू होते.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

(च) एका वाक्यात उत्तर द्या.

(१) भाऊरावांनी शाहू छत्रपतीचे कार्य पुढे नेले असे का म्हणतात?

______________________________

(२) अमृतलाल ठक्कर सातारा बोर्डिंग बद्दल काय म्हणाले?

______________________________

(३) गुलामाला गुलामीची जाणीव का करून दिली पाहिजे?

______________________________

(४) मंचर कॉलेजच्या प्रायार्यांनी कोणती किमया केली?

______________________________

(छ) विचाराचा ट्रॅक्टर कशासाठी ? ______
विचाराचा दीप कशासाठी ? ______
शिक्षणाची गंगा कशासाठी ? ______
वसतिगृह कशासाठी ? ______

(ज) अन्नधान्यासाठी बीजे पेरा म्हणजे पीक हाती येईल मग खालील वाक्ये याच रीतीने पूर्ण करा
आता विचार पेरा म्हणजे ______
आता माणसे पेरा म्हणजे ______
जर हिंसाचार पेरला तर ______

(झ) खालील व्यक्तींनी शिक्षणविषयक कोणती विचारसूत्रे मांडली ?
१ कर्मवीर पाटील. ______
२ डॉ. आंबेडकर. ______
३ म. जोतिबा फुले. ______
४ महात्मा गांधी. ______

(ग) विरुध्द अर्थाचे शब्द सांगा.
सबळ ______ परावलंबन ______
निष्क्रिय ______ उदासीन ______
प्रकाश ______ बंदिस्त ______

## ४.४ नमुना उत्तरे

(क) १ शिक्षण समाजपरिवर्तनासाठी
२ मनुष्यत्वाची प्रतिष्ठा हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे
३ विद्या माणसाला मुक्त करते आहे
४ श्रमाला प्रतिष्ठा आहे

(ख) श्रमाला प्रतिष्ठा दिल्याशिवाय शिक्षण अर्थपूर्ण होणार नाही.

(ग) शिक्षण हाच जीवनाधार आहे. ते घेतल्याशिवाय विकास होऊ शकणार नाही.

(घ) १ प्रसन्न
२ शिक्षणाचे संस्कार
३ निर्मितीसाठी

(ङ) १ शिक्षण प्रसाराचे कार्य आपले आहे हे विद्यावंत मुळीच मानीत नाहीत.
२ हात हे विध्वंसनासाठी नाहीत.
३ विद्या हे केवळ उपजीविकेचे साधन आहे काय?
४ ज्ञानार्जन

(च) १ त्यांनी सर्व जातींची मुले एकाच बोर्डिंगमध्ये राहावीत असे ठरवले.
२या बोर्डिंगातील मुले एका कुटुंबातील मंडळी प्रमाणे राहतात.
३ म्हणजे तो गुलामगिरीविरूध्द लढेल.
४ कॉलेज भोवतीचा परिसर हिरवागार केला.

(छ) जातीची हरळी काढण्यासाठी, अज्ञान दूर करण्यासाठी, सामुदायिक जीवन प्रेमाने जगण्यासाठी.

(ज) आता विचार पेरा म्हणजे माणसे निर्माण होतील
आता माणसे पेरा म्हणजे कार्यक्रान्ती होईल.
हिंसाचार पेरला तर हिंसाचारच वाढेल

(झ) कर्मवीर पाटील - स्वावलंबी शिक्षण हवे.
डॉ. आंबेडकर - शिका, लढा आणि संघटित व्हा
फुले - विद्येविना मती गेली.
गांधीजी - मने मिळवा, हात मळवा

(ग) निर्बळ, स्वावलंबन क्रियाशील, कार्यरत / उत्साही, अंधार,

## ४.५ अधिक अध्ययन

### ४.५.१ चरित्रातील ठळक घटना

| | |
|---|---|
| २२-९-१८८७ | कुभोज जि.सांगली येथे जन्म |
| १९१९ | रयत शिक्षणसंस्थेची स्थापना 'काले' येथे |
| १९२७ | पहिल्या वसतिगृहास म.गांधीजींची भेट |
| १९३० | पत्नी सौ.लक्ष्मीबाई पाटील यांचे निधन |
| १९३२ | पुणे येथे 'युनियन बोर्डिंग'ची स्थापना |
| १९३३ | म.गांधीच्या हरिजन सेवक फंडातून मदत वार्षिक रू. ५००/- |
| १९३४ | मुबंई शासनाची मदत |
| १९३६ | पहिली प्राथमिक शाळा |
| १९३८ | पहिली व्हालंटरी शाळा |
| १९४० | सातारा येथे हायस्कूल |
| १९४७ | सातारा येथे छत्रपति शिवाजी कॉलेज |
| १९५९ | पद्मभूषण देऊन सन्मान |
| | डी.लिट् पदवी पुणे विद्यापीठाची |
| ९ मे ५९ | पुणे येथे निधन. |

### ४.५.२ रयत शिक्षण संस्थेचा आजचा विस्तार

| | |
|---|---|
| ३१९ | माध्यमिक विद्यालये |
| १२ | केवळ स्त्रियांची हायस्कूले |
| ११ | कृषी विद्यालये |
| १८ | तांत्रिक विद्यालये |
| २७ | कला-वाणिज्य विज्ञान महाविद्यालये |
| ८० | वसतिगृहे |
| ८ | अध्यापक महाविद्यालये |
| २,६०,००० | विद्यार्थी शिकतात. |

## ४.६ सारांश

बहुजनसमाजाच्या शिक्षणासाठी समर्पित भावनेने काम करणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांना महाराष्ट्राच्या शिल्पकारात मानाचे स्थान आहे. शिक्षणक्षेत्रात ते महर्षी होते. जोतीराव फुले यांचे विचार व कार्य यापासून प्रेरणा घेऊन त्यांनी काले (जि.सातारा) येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. शिक्षणामुळे समाजपरिवर्तन होईल, स्वावलंबी शिक्षणामुळे शिक्षण अर्थपूर्ण होईल इ. विचारसूत्रे त्यांनी कृतीत उतरवली. विद्या माणसाला मुक्त करते म्हणून समाजातील सर्व स्तरांना शिक्षण घेण्याची संधी दिली पाहिजे. सर्व जातीची मुले एका वसतिगृहात कुटुंबासारखी राहतात. श्रमाला प्रतिष्ठा दिल्यामुळे विद्यार्थ्यांना हाताची ओळख पटली.

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

(१) 'भाऊरावांच्या विचारांचे आजच्या परिस्थितीत महत्त्व' या विषयावर निबंध लिहा.
(२) 'हात काम करण्यासाठी आहेत' यातला आशय एका परिच्छेदात मांडा
(३) 'हात' या शब्दाचा उपयोगा करून तयार झालेले वाक्प्रचार व म्हणी गोळा करा.
उदा. हात देणे - मदत करणे
हात फिरे तेथे लक्ष्मी वसे.

## ४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके.

कर्मवीर भाऊराव पाटील - मा.भि.काटकर.
कर्मवीर भाऊराव पाटील शोध आणि बोध - रा.ना. चव्हाण.
संपा.मो.नि.ठोके